पुण्य नगरी

# मोलाच्या पाण्याच्या थेंबासाठी 'ग्रे वॉटर' ठरणार वरदान

## वीर गोगीया विद्यार्थ्याने सोसायटीमध्ये राबवली ग्रे वॉटरची संकल्पना

**दादर :** वापरलेले पाणी वाया न घालवता ते स्वच्छ करून पुन्हा वापरात कसे आणता येऊ शकेल, हे 'ग्रे वॉटर'च्या माध्यमातून कसे करता येऊ शकते, ही संकल्पना द कॅथेड्रल अँड जॉन कनॉन स्कूलमध्ये बारावीत शिकणारा वीर गोगीया या १७ वर्षीय विद्यार्थ्याने सोसायट्यांमध्ये जाऊन राबवली.

ग्रे वॉटरच्या माध्यमातून पाण्याचा पुनर्वापर कसा करता येऊ शकेल, ते पाणी कुठे वापरू शकतो याचे प्रात्यक्षिक वीर गोगीया याने वरळी गांधीनगर परिसरातील शिवालय एसआरए सहकारी गृहनिर्माण सोसायटीतील रहिवाशांना करून दाखवले. यावेळी वरळी गांधीनगर येथील शिवालय एसआरए सहकारी गृहनिर्माण सोसायटीचे सल्लागार वसंत देवरे, सचिव उत्तम पवार, राजेंद्र साबळे, राकेश मनसुख तसेच संस्थेच्या पदाधिकारी आणि रहिवाशांनी या संकल्पनेचे कौतुक करत ही संकल्पना सोसायटीत राबवणार असल्याचे सांगितले.

ग्रे वॉटर म्हणजेच स्नान, हात धुणे किंवा वॉशिंग मशीनमध्ये वापरलेले पाणी जे पाणी पिण्यासाठी किंवा स्वयंपाकासाठी योग्य नसते. मात्र, हे पाणी स्वच्छ केल्यानंतर ते फ्लशिंग, बागकाम किंवा साफसफाईसाठी वापरता येऊ शकते, असे त्याने सांगितले. प्रत्येक लिटर पाणी जे नाल्यात वाया जाते, ते समुद्रकिनारे, नाले आणि सांडपाणी व्यवस्थेवर अधिक ताण आणते. मात्र, सर्वांनी ग्रे वॉटरच्या माध्यमातून पाण्याचा



योग्य वापर केल्यास पाण्याची बचत करू शकतो, असे वीर याने सांगितले.

### ग्रे वॉटरचा उपयोग

ग्रे वॉटर पुन्हा वापरल्याने टँकर आणि पंपिंगची गरज कमी होते, त्यामुळे खर्च आणि डिझेलचा वापर घटतो. नाले आणि सांडपाणी व्यवस्थेवरील भार कमी होतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, जास्त मागणीच्या किंवा पाणीटंचाईच्या दिवसांत हे पाणी फायदेशीर ठरते.

Mumbai Edition